# प्रेस नोट ता. २६/०९/२०२०

## महागडे मोबाईल फोन हिसकावुन जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन अटक, जबरी चोरीचे ०३ गुन्हे उघड

**एकुण २,०१,०००/- रु. किं चे ०४ मोबाईल फोन व ०२ मोटारसायकल जप्त**

मा.पोलीस आयुक्त सो, पिपरी-चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड परिसरात घडणारे वाहन चोरी, जबरी चोरी व घरफोडीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन घडलेले गुन्हे उघडकिस आणण्याचे आदेश दिल्याने पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा युनिट ४ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक मोहन शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली रेकॉर्ड वरील वाहन चोरीचे व इतर गुन्हेगार यांची तपासणी सुरू असताना गुप्तबातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सांगवी पोलीस ठाण्याचे हद्दित चोरी केलेले मोबाईल फोन विकण्यासाठी काही इसम एका मोटारसायकलवर सृष्टी चौक, नवी सांगवी येथे येणार आहे. मिळालेल्या माहिती नुसार वपोनि मोहन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख व स्टाफने सृष्टी चौक येथुन आरोपी नामे १) अशितोष प्रदिप परांडे वय-१९ वर्षे, रा.साई सिद्धी पार्क, बॉम्बे कॉलनी, दापोडी पुणे २) अभिषेक मुकुंद बारटक्के वय-२० वर्षे, रा.बापु काटे चाळ, बॉम्बे कॉलनी, दापोडी पुणे, ३) मतीन जुबेर शेख वय- १८ वर्षे रा.दळवी चाळ, बॉम्बे कॉलनी, दापोडी पुणे यांना सृष्टी हॉटेल चौक, नवी सांगवी यांना ताब्यात घेतले तेव्हा त्याचे कडे एक बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटारसायकल व ०१ मोबाईल फोन मिळुन आला. त्यांचे कडे केलेल्या तपासात सदर आरोपींनी मागील ०३ महिन्यात सांगवी व भोसरी पोलीस ठाणे हद्दित रस्त्याने फोनवर बोलत पायी चालत जात असलेल्या ०४ इसमांकडुन विविध कंपन्यांचे ०४ मोबाईल फोन हिसकावुन जबरी चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर आरोपीं कडुन गुन्हा करणे कामी वापरलेल्या ०२ मोटारसायकल तसेच विविध कंपन्यांचे एकुण ०४ महागडे मोबाईल फोन असा एकुण २,०१,०००/- रु. किं. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन त्यांचेकडुन खालील गुन्हे उघड झाले आहेत.

**१) सांगवी पोलीस स्टेशन गु.र.क्र. ३१०/२०२० भा.द.वि. कलम ३९२,३४**
**२) सांगवी पोलीस स्टेशन गु.र.क्र. ३८७/२०२० भा.द.वि. कलम ३९२,३४**
**३) भोसरी पोलीस स्टेशन गु.र.क्र. ४८०/२०२० भा.द.वि. कलम ३९२,३४**

सदरचे आरोपी हे शौकेखातर महागडे फोन चोरी करुन स्वतः च वापरत होते.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ सो, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील गुन्हे यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ पोना/ संतोष असवले, तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, व नागेश माळी, राजेंद्र शेटे तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा यांनी केली आहे.

**( मोहन दा. शिंदे )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवड




पिंपरी-चिंचवड पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय